॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242
FAX No. (02462) 229574

E-mail: approval@srtmun.ac.in
website: srtmun.ac.in

जावक क्र.शैक्ष/मान्यता/परिपत्रक/०२/२०२३–२४/1224 दिनांक : ०३/०१/२०२४

**सुधारीत परिपत्रक**

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

BY REGISTERED

विषय : आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांची अद्यावत माहिती Google Form मध्ये सादर करणेस **मुदतवाढ** देणे बाबत...

महोदय,

वरील विषयी कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील नियमित कार्यरत प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, संचालक शा.शिक्षण व क्रीडा आणि ग्रंथपाल यांची अद्यावत वैयक्तिक माहिती शैक्षणिक (मान्यता) विभागास विविध कामासाठी आवश्यक असून, त्यासाठी नियमित शिक्षकांची उपरोक्तप्रमाणे माहिती Google Form मध्ये भरून त्यात Designation च्या रकानामध्ये जे शिक्षक Professor, Associate Professor व Assistant Professor म्हणून कार्यरत आहेत तेच उल्लेख करणे, मान्यतेचा प्रकार मध्ये कायम, परिविक्षाधीन, तदर्थ इत्यादी बाबी स्पष्ट नमूद करावी. तसेच अनुभवा संदर्भात पदवी व पदव्यूत्तर स्तरावरील अनुभव हा स्वतंत्रपणे नमूद करावा.

करीता आपल्या महाविद्यालयातील नियमित शिक्षकांची उपरोक्तप्रमाणे माहिती Google Form मध्ये भरून दिनांक २०/१२/२०२३ पर्यंत सादर (Submit) करणे बाबत यापुर्वीच्या परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते, तथापी, काही तांत्रिक अडचणीमुळे बहुतांश महाविद्यालयास शिक्षकांची माहिती सादर करता आली नाही. शिक्षकांची माहिती भरण्यास दिनांक १५/०१/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी ज्यांनी शिक्षकांची माहिती यापुर्वी गुगल फॉर्म पुढील लिंकद्वारे सादर केले नाहीत त्यांनी दिनांक १५/०१/२०२४ पर्यंत विनाविलंब सादर करावी.

सदर गुगल फॉर्म भरणेसाठी http://forms.gle/Rjye5RrueotjH3gr9 फाईलचा उपयोग करावा व सदर माहितीची एक Hard Copy ची प्रत approval@srtmun.ac.in वर पाठविण्यात यावी. सदर माहिती शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी मागितल्याप्रमाणे देणे आवश्यक असते. तसेच निवड समितीवर मा.कुलगुरू प्रतिनिधी/विषय तज्ज्ञ म्हणून नामनिर्देशनासाठी ही सदरची माहिती आवश्यक आहे. करीता अचुक व विनाविलंब माहिती **दिनांक १५/०१/२०२४** पर्यंत वरील लिंक फाईल वर सादर करावी, ही विनंती.

**सूचना** : १) स्थानिक निवड समिती मार्फत नियुक्त शिक्षकांची माहिती व घडयाळी तासिका तत्वावर (CHB) नियुक्त झालेल्या शिक्षकांची माहिती सदर Google Form मध्ये पाठवू नये.

२) ज्या शिक्षकांची यापुर्वी गुगल फॉर्ममध्ये माहिती सादर केली आहे त्यांनी परत माहिती पाठवु नये.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

**प्रत** :– सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.